महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१२ वा | दिनांक : १५/०६/२०२५ | वार : रविवार

## बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित



**अमरावती** : शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गत ७ दिवसांपासून अन्नत्याग उपोषण करणाऱ्या बच्चू कडू यांनी शनिवारी आपले उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. या प्रकरणी त्यांनी सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर २ ऑक्टोबर रोजी आम्ही थेट मंत्रालयात शिरू, असे ते या प्रकरणी सरकारला इशारा देताना म्हणालेत.

प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू गत ७ दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी अन्नत्याग उपोषण करत होते. या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. पण त्यानंतरही बच्चू कडू यांनी आपले उपोषण नेटाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्यांनी परवापासून थेट अन्नत्याग करण्याचाही इशारा दिला होता. त्यामुळे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी तातडीने त्यांची भेट घेऊन त्यांना सरकार आपल्या मागण्यांवर सकारात्मक असल्याचे सांगत त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उदय सामंत यांच्या विनंतीचा मान राखत आपले अन्नत्याग उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. उद्याचे चक्का जाम आंदोलन स्थगित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बच्चू कडू उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले, सरकारने आपल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घेत नाही, तर स्थगित करत आहोत. सरकारने आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर २ ऑक्टोबर रोजी आपण थेट मंत्रालयात शिरू. आपण सरकारला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा चकवा देऊ. सांगू नागपूरला व जाऊ मुंबईला. यांना आपण एकदा छत्रपतींचा गनिमी कावा दाखवू.

मुख्यमंत्री सध्या आम्हाला तारीख सांगण्यास तयार नाहीत. पण आम्ही त्यांना २ ऑक्टोबरची तारीख दिली आहे. या तारखेपर्यंत सरकारला कर्जमाफी द्यावीच लागेल. अन्यथा आम्ही त्यांना माफ करणार नाही. आत्ता आपण हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करत आहोत. मी कार्यकर्त्यांचा अंत पाहू शकत नाही. ते माझ्याशिवाय उठण्यास तयार नाहीत. एक आज्जी तर ऐकण्यास तयारच नव्हती. सर्वच जातीधर्माच्या लोकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यांचे मी आभार मानतो. हे यश आमचे नव्हे तर इथे येणाऱ्या सर्वांचे यश आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही उदय सामंत यांच्या घराबाहेर आंदोलन करू, असा इशाराही बच्चू कडू यांनी यावेळी दिला

मी आता महाराष्ट्रभर दौरे करेन. हे आंदोलन अधिक मजबूत करेन. तुम्ही कोणत्याही पक्षात राहा. कोणत्याही नेत्याचा मानसन्मान करा. पण शेतकऱ्याच्या मुद्यावर एकजूट व्हा, असे आवाहनही बच्चू कडू यांनी यावेळी जनतेला केले.

मी पाणीही सोडण्याचा निर्णय घेतला होता. कारण, हे सरकार तोपर्यंत मानणार नव्हते. पण डॉक्टरांनी माझ्या लिव्हरचा प्रॉब्लेम सुरू झाल्याचे सांगितले. उद्या कदाचित दवाखान्यात भरतीही व्हावे लागेल. त्यामुळे अशा सर्व गोष्टी पाहून आपण तूर्त हे आंदोलन मागे घेत आहोत. आपण २ ऑक्टोबरला पुन्हा नव्या दमाने हे आंदोलन सुरू करू, असे ते म्हणाले.

शासनाने बच्चू कडू यांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वाक्षरीचे एक पत्र देण्यात आले आहे. त्यात त्यांना खालील ३ आश्वासने देण्यात आली आहेत.

१. शेतकरी कर्जमाफीसाठी १५ दिवसांत उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्जमाफी संदर्भात निर्णय घेण्यात येईल तथा थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देणे व नवीन कर्ज वाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

२. दिव्यांगाच्या मानधन वाढी बाबत ३० जूनच्या पुरवणी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल.

३. उर्वरित मुद्यांवर संबंधित मंत्री तथा मुख्यमंत्री महोदय यांच्यासोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील.

## शेतकरी कर्जमाफीचा विषय जाहिरनाम्यात नव्हता : अतुल सावे यांचा दावा



**हिंगोली** : शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून राज्यात रान पेटले असताना भाजप नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी आपल्या पक्षाच्या जाहिरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा कोणताही विषय नव्हता असा दावा केला आहे. त्यांचा हा दावा भाजपसाठी अडचणीचा ठरण्याची चिन्हे आहेत.

अतुल सावे शनिवारी हिंगोलीच्या दौऱ्यावर होते. तेथील शासकीय विश्रामगृहात मोदी सरकारची यशस्वी ११ वर्षे या मुद्यावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी उपरोक्त दावा केला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, आमदार तान्हाजी मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, फुलाजी शिंदे, शिवा घुगे, उमेश नागरे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी पत्रकारांनी अतुल सावे यांना शेतकऱ्यांना कर्जमाफी केव्हा देणार? असा प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले, आमच्या जाहिरनाम्यात कर्जमाफीचा विषय नव्हताच. तुम्ही जाहिरनामा तपासून पाहा. त्यात ज्या बाबी नमूद आहेत, त्या प्राधान्यक्रमाणे पूर्ण केल्या जात आहेत. नदीजोड प्रकल्प व वॉटर ग्रीडच्या ६१ हजार कोटी रुपयांच्या आराखड्याच्या सर्वेक्षणासाठी निधी देण्यात आला आहे. देशातील हा सर्वात मोठा नदीजोड प्रकल्प आहे. त्यामुळे राज्याची तहान भागणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात ५० वर्षे दुष्काळ पडला किंवा पाऊस पडला नाही तरी, समुद्रात जाणारे पाणी या महाराष्ट्राला मिळेल. यामुळे येणाऱ्या काळात कुठल्याही प्रकारचा दुष्काळ किंवा शेतकऱ्यांना पाण्याची कमतरता भासणार नाही.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी अहमदाबादेतील विमान दुर्घटना सायबर हल्ल्यामुळे झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. अतुल सावे यांनी यासंबंधी संजय राऊत यांच्यावर टीका केली. विमान दुर्घटनेची चौकशी करण्यात येत आहे. त्यातून सर्व सत्य बाहेर येईल. अशा घटना सायबर अटॅकमुळे होत नाहीत. त्यामुळे राऊतांनी चुकीचे वक्तव्य करू नये, असे ते म्हणाले.

राज्यातील तांडावस्तीच्या कामांना स्थगिती दिल्याच्या प्रश्नावर अतुल सावे यांनी काही कामे अपूर्ण होती, ती कामे पूर्ण होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्या कामांना स्थगिती देण्यात आल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणी आता नव्याने प्रस्ताव मागिवले जात आहेत. नवीन प्रस्ताव आल्यानंतर त्याला मंजुरी दिली जाईल, असे ते म्हणाले.

दरम्यान, अतुल सावे यांनी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या उपोषणावरही भाष्य केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची भेट झाली असून पुढील काही दिवसांतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट होईल. त्यातून त्यांचे प्रश्न नक्कीच मार्गी लागतील, असे ते म्हणाले.

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईंडींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ जून २०२५


## पुण्यात एका रात्रीत तीन ठिकाणी चोरी

**पुणे :** पुणे शहरातील रविवार पेठेत एका सराफी पेढीचा दरवाजा तोडून चोरट्यांनी १४ लाख ९५ हजारांचे दागिने चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.याबाबत सराफी दुकानाचे मालक राजीव खताळ (वय ३५, रा. कोंढवा खुर्द) यांनी अनोळखी आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खताळ यांचे रविवार पेठेत रामलीला ही सराफी दुकान आहे. चोरट्यांनी सराफी दुकानाच्या दरवाज्याचे कुलूप तोडले. दुकानांतून सोन्याचे, तसेच हिरेजडीत दागिने असा १४ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज लांबवून चोरटे पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक एस हाळे तपास करत आहेत.

लोहगाव-धानोरी रस्त्यावरील साठे वस्तीत एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी ४३ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. याबाबत कांता चौधरी (वय ६२, रा. शिवकृपा निवास,साठे वस्ती, लोहगाव-धानोरी रस्ता) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चौधरी कुटुंबीय ११ जून रोजी बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले. कपाटातील मूर्ती, सोन्याचे दागिने, मनगटी घड्याळ , रोकड असा ४३ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. पोलीस हवालदार आदलिंग करत आहेत.

# बोलटेक, भोकनगाव शिवारात वीज पडून शेतकरी जखमी



**कन्नड (अरुण थोरात) :** बोलटेक ता.कन्नड शिवारातील शेतकरी दादाराव पवार व त्यांचे कुटुंब शेतात काम करीत असताना दुपारी वादळ वाऱ्यासह जोरदार पाऊस, विजेचा कडकडा होत असल्यामुळे त्यांनी जवळील असलेल्या एका झाडाचा आश्रय घेतला त्या झाडावरती वीज पडली त्यात शेतकरी जखमी झाले. बोलटेक गावातील रहिवासी दादाराव तुकाराम पवार (वय वर्ष ६०) दि.14 जून रोजी दुपारी ३.१५ वाजे दरम्यान आपल्या शेतात काम करीत असताना झाडावरती वीज पडली जवळच उभा असलेले दादाराव व त्यांच्या पत्नी चंद्रकलाबाई दादाराव पवार (वय ५५ वर्षे) हे दोघेही जखमी झाले त्यांच्या हाताला व पाठीला गंभीर दुखापत झाली. तसेच भोकनगाव येथील नितीन भिमराव शिंदे (वय २४) हे शेतात काम करीत असताना त्यांच्या पासून थोडे अंतरा वरती वीज कोसळली व त्यांना त्याचे करंट लागले त्यामुळे डाव्या हाताला दुखापत झाली. दुसऱ्या एक घटनेतगणेशपुर शिवारातील गट नंबर ४३ शेतकरी तातेराव भीमराव पवार यांच्या शेतात झाडावरती वीज पडली व झाडाखाली बांधलेल्या बैल मृत्युमुखी पडला. बोलटेक व भोकनगाव येथील रुग्णावरती कन्नड येथील डॉ. सिताराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विशाल गायकवाड डॉ. अय्याज उजाडे, डॉ. उमेश देहेतकर यांनी तातडीने इलाज केला. जाधव हॉस्पिटल येथे त्यांच्यावर उपचार चालू आहे. घटनेची माहिती मिळताच कन्नडचे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी तात्काळ जाधव हॉस्पिटल मध्ये भेट देऊन वीज पडलेल्या रुग्णांची चौकशी केली. त्यांच्यासोबत चापानेर सजा चे तलाठी शिल्पा काशीनंद, कडूबा नेनेकर, अंधानेरचे सरपंच अशोक दाबके, श्री अनावडे उपस्थित होते.

## ह.भ.प. डॉ. चारुदत्त आफळे बुवा यांचे भागवत कथेचे आयोजन



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड)** छत्रपती संभाजीनगर शहरात पुढच्या आठवड्यात ज्येष्ठ कीर्तनकार तसेच निरुपणकार ह.भ.प. डॉ. चारुदत्त आफळे बुवा यांचे सात दिवस भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.याबाबत माहिती देण्यासाठी अध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, उपाध्यक्ष उमेश भालगावकर, सचिव श्रीपाद टाकळकर, कार्याध्यक्ष श्रीनिवास पाथरीकर यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी भागवत कथेची श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह समितीच्या वतीने आयोजित केली आहे. स्थळ आहे.देवगिरी नागरी सहकारी बँक , प्रशिक्षण केंद्र क्रांती चौक,छत्रपती संभाजीनगर दिनांक : १५ जून २०२५ रविवारवेळ : सायंकाळी ४ वाजता आयोजक : श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह समिती व योगेश भोसले आणि धनंजय ब्रह्मपूरकर, छत्रपती संभाजीनगर ९४२१७०४११६ यांनी आवाहन केले आहे की जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे सांगितले आहे

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** हजरत मोमीन आरिफ दर्गा चे मुतवली शेख सईद रशिदोदिन वय ७० वर्ष राहणार दौलताबाद यांचे अल्पशा आजाराने दि १४ जून शनिवारी दुपारी निधन झालेत्याचे दफनविधी हजरत मोमीन आरिफ बिल्ला ह दर्गा येथे ईशा नमाज नंतर करण्यात आलेत्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा,तीन मुली,भाऊ, बहिणी नातवंडे असा परिवार आहे







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ जून २०२५


## नवज्योत सिद्धू म्हणाले- राजकारण हा माझा व्यवसाय नाही, तर मिशन



**अमृतसर :** पंजाब काँग्रेस नेते आणि माजी क्रिकेटपटू नवज्योत सिंग सिद्धू पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. अलिकडेच कपिल शर्मा शोमध्ये त्यांच्या पुनरागमनाची चर्चा होती आणि आज त्यांनी राजकारणात परतण्याबद्दलही भाष्य केले आहे. ते म्हणाले की ते पैसे कमविण्यासाठी राजकारणात आले नाहीत.

आज अमृतसरमधील ग्यानी टी स्टॉलच्या बाहेर नवज्योत सिंग सिद्धू दिसले, जिथे त्यांनी सांगितले की ते कधीही राजकारणाला व्यवसाय मानत नाहीत. सध्याच्या सरकारवर निशाणा साधत सिद्धू म्हणाले की पंजाब माफियासारखा चालवला जात आहे. त्यांच्या मते, राज्याच्या विकासासाठी सरकारकडे कोणतेही व्हिजन नाही. त्यांनी स्पष्ट केले की ते व्यवसाय करण्यासाठी नाही तर बदल घडवून आणण्यासाठी राजकारणात आले आहेत.

गेल्या ३० वर्षांच्या सरकारांवर भाष्य करताना सिद्धू म्हणाले की, सर्व सरकारे माफियांच्या नियंत्रणाखाली होती. त्यांच्या प्रामाणिकपणाचा उल्लेख करताना ते म्हणाले की, १५ वर्षांच्या राजकारणात त्यांच्यावर एकही आरोप झालेला नाही.

२०२७ च्या निवडणुकीपूर्वी हे विधान आले आहे. यापूर्वी त्यांच्या पत्नी नवजोत कौर सिद्धू यांनीही आजारातून बरे झाल्यानंतर राजकारणात परतण्याबद्दल बोलले होते. राज्याच्या सध्याच्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करताना सिद्धू म्हणाले की, पंजाबमध्ये कोणतेही धोरणात्मक बदल झालेले नाहीत आणि सरकार फक्त कर्ज घेऊन राज्य चालवत आहे.

याआधी, नवज्योत सिंग सिद्धू काही दिवसांपूर्वी कपिल शर्मा शोमध्ये परतल्यामुळे चर्चेत होते. ते सहा वर्षांनी द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये परतत आहेत. गेल्या महिन्यात त्यांनी स्वत:चे यूट्यूब चॅनेल देखील लाँच केले.

नवज्योत सिंग सिद्धू यांनी आज स्पष्टपणे सांगितले की, त्यांना पंजाबवर प्रेम आहे आणि राजकारण हे त्यांचे ध्येय आहे. त्यांना त्यांच्या प्रेमाच्या बदल्यात काहीही नको आहे परंतु पंजाबसाठी बदल आणि धोरणांबद्दल बोलणाऱ्या प्रत्येकासोबत ते असतील.

खरं तर, पंजाबमध्ये वेळोवेळी काँग्रेससाठी समस्या निर्माण करणारे नवज्योत सिंग सिद्धू पक्षावर खूप नाराज असल्याचे दिसून येते. ते म्हणतात की गेल्या ३० वर्षात पंजाबमध्ये आलेली सर्व सरकारे माफियांनी चालवली होती, परंतु मी अजूनही माझ्या तत्वांवर ठाम आहे.

नवज्योत सिंग सिद्धू पुढे म्हणाले की, गेल्या १५ वर्षांच्या राजकारणात माझ्यावर काही आरोप असतील तर मला सांगा. मी माझा विवेक आणि चारित्र्य ढळू दिले नाही. पंजाबमध्ये बदलासाठी कोणतेही धोरण आणले गेले नाही, किंवा कोणताही कार्यक्रम जाहीर केला गेला नाही. सरकार अनेक वर्षांपासून कर्ज घेऊन पंजाब चालवत आहे. उलट, ते माझ्यावर मोठ्याने बोलण्याचा आरोप करतात.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## भिंत कोसळून एकाचा मृत्यू - कोळवाडीतील दुर्दैवी घटना



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** तालुक्यातील कोळवाडी गावात गुरुवारी सायंकाळी झालेल्या जोरदार वादळी पावसामुळे एका भिंतीचा कोसळून अपघात झाला. या दुर्घटनेत समाधान बंडू गवळी (वय ४९, रा. कन्नड) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.समाधान गवळी हे मासे विक्रीसाठी कोळवाडी येथे गेले होते. सायंकाळी सुमारे ६:३० वाजता ते घराकडे परतत असताना अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे त्यांनी रस्त्यालगतच्या जुन्या शेडजवळ आसरा घेतला. मात्र वाऱ्याच्या जोरामुळे भिंत कोसळली आणि त्यांच्यावर पडली. डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे त्यांना तातडीने कन्नड ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून त्यांच्या पश्चात पत्नी, आई, दोन मुले, बहीण आणि भाऊ असा परिवार आहे.

## भाजप आमदार संजय कुटे यांचे घर जाळण्याचा प्रयत्न




**जळगाव जामोद :** भाजपचे आमदार संजय कुटे यांचे निवासस्थान पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास जळगाव जामोद येथे हा प्रकार घडला. संग्रामपूर तालुक्यातील एका अतिवृष्टी पीडित शेतकऱ्याने नुकसान भरपाई न मिळाल्याने संतापाच्या भरात हे कृत्य केले. याप्रकरणी, संबंधित शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्याच्या अनेक भागांमध्ये यंदा मे महिन्याच्या शेवटीच जोरदार पावसाने हजेरी लावली. परिणामी, शेतपिकांसह फळबागांचेही मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असतानाही, शासनाच्या मदतीची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत अजूनही कोणतीही ठोस मदत पोहोचलेली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान होऊनही त्याचा मोबदला न मिळाल्याने, संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील शेतकरी विशाल मुरुड यांनी आपला संताप व्यक्त करत, थेट भाजप आमदार संजय कुटे यांच्या निवासस्थानात पेट्रोल टाकून आग लावण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. त्यावेळी आमदार संजय कुटे हे आपल्या जळगाव जामोद येथील निवासस्थानी उपस्थित होते. विशाल मुरुड यांनी बंगल्याच्या परिसरात प्रवेश केला. त्यांच्या हातात पेट्रोलचे कॅन होते. "माझ्या शेतात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला अद्याप मिळाला नाही. त्यामुळे मी आमदारांचा बंगला जाळून टाकतो," असे म्हणत ते थेट प्रवेशद्वाराच्या दिशेने मार्गक्रमण केले.

शेतकरी विशाल मुरुड हे बंगल्याच्या प्रवेशद्वाराकडे जात असताना आमदार कुटे यांचे स्वीय सहायक सतर्क झाले आणि त्यांनी विशाल मुरुड यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत, विशाल मुरुड यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता (BNS) अंतर्गत कलम ३३३ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील चौकशी जळगाव जामोद पोलिस करत आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ जून २०२५


# मंत्री जयकुमार गोरेंची शरद पवारांवर टीका



**मुंबई :** राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर खोचक टीका केली आहे. राज्यात व देशात अनेक जाणते राजे झाले, पण त्यांनी कधी विठूरायाकडे जाणारा पालखी मार्ग बनवण्याचे कष्ट घेतले नाही, असे ते म्हणालेत.

मंत्री जयकुमार गोरे यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील संतांचा पालखी मार्ग व तळांची पाहणी केली. तसेच वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोईसुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी शरद पवारांवर निशाणा साधला. राज्यात व देशात अनेक जाणते राजे झाले. पण त्यांनी कधी विठूरायाकडे येणाऱ्या पालख्यांसाठी मार्ग बनवला नाही. याऊलट पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यासाठी भरपूर काम केले. हे दोन्ही नेते दिल्लीत बसत असले तरी त्यांनी देशाला जोडण्याचे काम केले नाही. पंतप्रधान मोदींनी केवळ गरिबी हटावची घोषणाच केली नाही, तर त्यासाठी अनेक योजना आणल्या, असे मंत्री गोरे म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे जयकुमार गोरे यांनी शरद पवारांवर टीका करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी मार्च महिन्यात त्यांनी आपले राजकारण संपले तरी चालेल, पण शरद पवारांपुढे झुकणार नाही अशी भूमिका व्यक्त केली होती. माण खटावच्या लोकांनी बारामतीच्या पवारांवर प्रचंड प्रेम केले. पण आता त्यांना एका सामान्य कुटुंबातील मुलगा आमदार झाल्याचे त्यांना बघवत नाही. रेशन दुकानदाराचा मुलगा आमदार झाल्यामुळे पवारांना वाईट वाटत आहे. मी मंत्री झाल्याचे त्यांना मान्यच होत नाही. मी बारामतीपुढे झुकलो असतो तर माझी आमदारकी सोपी झाली असती. पण यामुळे आपल्या शेतात पाणी आले नते. मी त्यांची गुलामगिरी स्वीकारली असती तर माण खटावला पाणी मिळाले नसते, असे ते म्हणाले होते.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी आषाढी एकादशीचा पालखी सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे. ते म्हणाले, आषाढी एकादशी निमित्त पुण्यात दरवर्षी पांडूरंगाच्या देहू व आळंदीहून संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराजांची पालख्या येतात. या प्रकरणी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांनी बैठक घेतली. विभागीय आयुक्त एका पालखी मार्गाने सोलापूरला गेले आणि दुसऱ्या पालखी मार्गाने परत आले. त्यातून त्यांनी पालखी मार्गाचा आढावा घेतला. मानाच्या पालख्यांची बैठक झाली. त्यांच्या सर्व सूचनांचा आदर प्रशासनाने केला आहे. राज्य सरकारने यंत्रणेवर जबाबदारी टाकली आहे. सरकारने योग्य तो निधीही उपलब्ध करून दिला आहे.

यंदा मे व जूनमध्ये चांगला पाऊस होत आहे. त्यामुळे यंदा वारकरी व शेतकऱ्यांची पालखीतील संख्या वाढण्याची शक्यता आहे. दिवे घाटात काम सुरू आहे. हा घाट आता ७ मीटरचा असून, तो २१ मीटर रुंदीचा केला जात आहे. ते काम राष्ट्रीय महामार्ग विभाग करत आहे. या ठिकाणी यंदा कुणालाही अडचण येणार नाही. तिथे योग्य ती खबरदारी घेतली जात आहे, असे पवार म्हणाले.

# नेत्यांनी चुकीची विधाने करू नयेत - अमित शहा



**पचमढी :** भाजप आमदार आणि खासदारांच्या प्रशिक्षण शिबिराला आज मध्य प्रदेशातील पचमढी या हिल स्टेशनमध्ये सुरुवात झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्याचे उद्घाटन केले. त्यांनी खासदार आणि आमदारांना संबोधित केले. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान हे देखील कार्यक्रमात उपस्थित होते. प्रशिक्षण शिबिराला संबोधित केल्यानंतर शहा येथून भोपाळला रवाना झाले.

मध्य प्रदेश सरकारचे सर्व मंत्री, आमदार, लोकसभा आणि राज्यसभा खासदार या तीन दिवसांच्या कार्यक्रमात प्रशिक्षणार्थी म्हणून सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव संपूर्ण तीन दिवस या कार्यक्रमात उपस्थित राहतील. म्हणजेच, पुढील तीन दिवस संपूर्ण सरकार पचमढी येथून चालेल.

तत्पूर्वी, भाजप प्रदेशाध्यक्ष व्ही.डी. शर्मा यांनी केंद्रीय मंत्री वीरेंद्र कुमार खटिक, एल. मुरुगन, दुर्गादास उईके, सावित्री ठाकूर, मध्य प्रदेश सरकारचे मंत्री आणि आमदार आणि खासदारांसह पचमढीच्या कॅन्ट परिसरातील स्मशानभूमीजवळ एक पेड माँ के नाम मोहिमेअंतर्गत रोपे लावली. या उद्यानाला अटल वाटिका असे नाव देण्यात आले आहे.

पीडब्ल्यूडी मंत्री राकेश सिंह म्हणाले की, भाजपमध्ये प्रशिक्षण शिबिर हा पक्षाच्या कार्यप्रक्रियेचा एक भाग आहे. आम्ही त्या दृष्टिकोनातून त्यात सहभागी होत आहोत. मंत्रिमंडळ तीन दिवसांसाठी येथे असल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, एक कार्यप्रक्रिया असते. याद्वारे सरकारचे काम चालू राहते.

रेवाचे खासदार जनार्दन मिश्रा म्हणाले की, प्रशिक्षण वर्गामुळे लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांमध्ये गुणात्मक बदल घडतात. यामुळे पक्षाच्या चालीरीती, धोरणे, आचरण, चारित्र्य आणि चेहऱ्यांमध्ये बरीच सुधारणा होण्याची शक्यता आहे.

हा एक मंत्र आहे, प्रशिक्षण वर्ग. ज्याप्रमाणे दररोज मंत्रांचा जप केला जातो. त्याचप्रमाणे भाजप कार्यकर्त्यांना जागृत करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करत राहते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact : 9405109103
8830838903